# जिल्हा परिषद अमरावती

कार्यवृत्त

दिनांक २६ जुलै २०१६ रोजी बांधकाम विभागातंर्गत सुरु असलेल्या कामांचा आढावा कार्यकारी अभियंता, विभागातील शाखा अभियंता आणि संबंधित कर्मचारी यांचेकडून घेण्यात आला. सभेत खालील प्रमाणे सूचना देवून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेत.

**मुद्या क्रमांक : १ - स्थायी समिती अनुपालन -**

दिनांक २९ जुलै २०१६ रोजी होणाऱ्या सभेसाठी अनुपालन मुद्या क्रमांक ८ आणि ९ करिता सूचनांप्रमाणे सविस्तर अहवाल तयार करुन सादर करण्यात यावा. सदर अहवालाची एक प्रत या कार्यालयास दिनांक २८ जुलै २०१६ रोजी या कार्यालयास सादर करावी.

**मुद्या क्रमांक : २ - सन २०१३- १४ च्या अखर्चित निधीबाबत -**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेला निधी मार्च २०१४ नंतर अखर्चित राहीला. सदर निधी अखर्चित राहण्यास जबाबदार तत्कालिन कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा सादर करण्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने तत्कालिन कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांचेकडून खुलासा प्राप्त करुन घेण्यात यावा.

**मुद्या क्रमांक : ३ - उर्ध्व सिंचन रस्त्यांसाठी ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

सहा. अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ अमरावती यांचेकडून प्राप्त पत्रानुसार निम्न साखळी लघु प्रकल्प ता. नांदगांव खंडे. प्रकल्पाचे क्षेत्रातील सालोड-गोळेगांव रस्त्याचे व पुल उंच करणे ग्रामीण मार्ग ७ तसेच येसूर्णा- सावळी रस्त्यांवरील सपन नदीवरील पुल उंच करणे याबाबतचे कामास ना-हरकत देण्याबाबत सदर पत्रान्वये मागणी केली आहे. सदरचे दोन्ही विषय मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्राध्यान्यक्रमातील विषय आहेत.

येसूर्णा-गोळेगांव रस्त्याचे कामाबाबतचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, पुल संकल्प चित्र मंडळ कोकण भवन मंबई यांचेकडे सादर करण्यात आला असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. तसेच निम्न साखळी प्रकल्पाबाबतच्या प्रस्तावाची माहिती घेवून तातडीने आवश्यक कार्यवाही कार्यकारी अभियंता यांनी करावी.

**मुद्या क्रमांक : ४ - ३०५४ आदिवासी क्षेत्रातील कामांच्या प्रशासकीय मान्यतेबाबत -**

सन्मा. जि.प. सदस्य श्री. सुधीर सुर्यवंशी यांनी सन २०१५ मार्च/एप्रिल मध्ये आदिवासी क्षेत्रातील कामांच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यानंतर सुध्दा अद्यापपर्यंत निविदा प्रक्रिया व तद्अनुषंगिक कार्यवाही झाली नसल्याचे पत्राव्दारे कळविले आहे. सदर पत्राचे अनुषंगाने अनुपालन तयार करुन सन्मा. सदस्य तसचे मा. मु.का.अ. व या कार्यालयास सादर करावे.

**मुद्या क्रमांक : ५ -** अमरावती उप विभागातील शाखा अभियंता श्री. खान आणि कनिष्ट अभियंता श्री. अडगोकार यांना अद्याप कामाचे वाटप करण्यात आले नसल्याचे उप मु.का.अ. (सामान्य) यांनी मा. मु.का.अ. यांचे बैठकीत निदर्शास आणून दिले. याबाबत तातडीने आवश्यक कार्यवाही करावी.

**<u>मुद्या क्रमांक : ६ -</u>** स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेप्रमाणे बांधकाम विभागातील विद्युत अभियंता श्री. पोफळी यांचे विरुध्द खाते चौकशी सुरु करण्यासाठी जोडपत्र सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. श्री. पोफळी यांचेविरुदच्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता यांनी चौकशी करुन सदरचा अहवाल मा. मु.का.अ. आणि या कार्यालयास सादर करावा.

तसचे विद्युत विषयक कामांना तांत्रिक मंजुरी देण्यास सक्षम प्राधीकरणाबाबत कोण राहील याबाबत शासन परिपत्रक /शासन निर्णय तपासून टिपण्णी सादर करावी.

**<u>मुद्या क्रमांक : ७ - प्राथमिक/माध्यमिक शाळा खोल्या दुरुस्तीबाबत. तसेच लेखाशिर्षक ३०५४ कामांच्या प्रगतीबाबत-</u>**

प्राथमिक शाळा खोल्या दुरुस्ती/बांधकामे संदर्भात आढावा घेतला असता- सन २०१४-१५ मधिल १३८ मंजुर कामांपैकी ९९ कामे पूर्ण झाली असून ६ कामे प्रगतीत आहेत. परंतु १४ कामांना अद्याप सुरुवात झालेली नाही. तसेच १८ कामे निविदा प्रक्रियेत आहेत. तसेच सन २०१५-१६ मधिल मंजुर १३० कामांपैकी ४ पूर्ण/६ प्रगतीत/७६ निविदास्तरावर असून ४४ कामे अद्यापही सुरु न झालेली नाहीत. निविदा स्तरावरील (१८ + ७६ ) कामांचे सविस्तर विवरण बांधकाम विभागाने तयार करुन सादर करावे. तसेच जी कामे अद्यापही सुरु झालेली नाही त्या कामांची उप विभाग निहाय माहिती तयार करुन सादर करावी. सदर कामांचा कार्यकारी अभियंता यांनी नियमित फालो-अप घेण्यात यावा. निविदा स्तरावरील कामें याच आठवडयात अंतिमतः पूर्ण करण्याचे मा. मु.का.अ. यांनी निर्देश दिलेत.

तसचे उर्वरीत कामांसाठी काम वाटप समितीची बैठक तातडीने आयोजित करण्यात यावी. पुढील काही महिन्यात जिल्हा परिषद/पंचायत समित्यांच्या निवडणूकीची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असल्याने सदर कामांची वर्क -ऑर्डर सप्टेबर २०१६ अखेर पावेतो देण्याचे नियोजन करावे. त्याचबरोबर लेखाशिर्ष ३०५४, पशुवैद्यकीय दवाखाना बांधकामे, तीर्थक्षेत्र विकास योजना इ. कामांची आढावा घेण्यासाठी उप अभियंता यांची बैठक ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवडयात आयोजित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता यांनी तद्पूर्वी पुर्वनियोजन करुन माहितीची टिपण्णी या कार्यालयास सादर करावा. आणि सभेच्या अनुषंगाने दिलेल्या सूचनांचे अनुपालन करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(संजय इंगळे)**
का.प्रत. **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

जा.क्र : जिप/अतिमुकाअ/स्विस/०९ /१६
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : २८ जुलै २०१६

प्रति,
कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद अमरावती.

**प्रतिलिपी सविनय सादर - मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती.**